स्थायी समितीच्या विशेष सभा बुधवार दिनांक 28–02–2018 रोजी सकाळी 11–00 वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. संदिप चंद्रभान जाधव | सभापती |
| 2. | श्रीमती संगीता दिपक गिऱ्हे | सदस्या |
| 3. | श्रीमती दुर्गा चंद्रभुषण हत्तीठेले | सदस्या |
| 4. | श्रीमती भाग्यश्री गणेश कानतोडे | सदस्या |
| 5. | श्रीमती सरला कमलेश नायक | सदस्या |
| 6. | श्रीमती मनिषा सुनिल कोठे | सदस्या |
| 7. | श्रीमती सरिता ईश्वर कावरे | सदस्या |
| 8. | श्रीमती लता सुनिल काडगाये | सदस्या |
| 9. | श्रीमती जयश्री मोहन वाडीभस्मे | सदस्या |
| 10. | श्री. जितेन्द्र भास्कर घोडेस्वार | सदस्य |
| 11. | श्री. हरीश मोहन ग्वालबंशी | सदस्य |
| 12. | श्री. मनोज दशरथ सांगोळे | सदस्य |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्रीमती रिता अशोक मुळे | सदस्या |
| 2. | श्रीमती उषा टॉबी पॅलट | सदस्या |
| 3. | श्रीमती नेहा नरेन्द्र वाघमारे | सदस्या |
| 4. | श्रीमती अंसारी सय्यदा बेगम मो.निजामुद्दीन | सदस्या |

## उपस्थित अधिकारी

1. श्री. रविन्द्र कुंभारे, अति. आयुक्त
2. श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

ठराव क्रमांक 590:– {स्लम विभाग} मंगळवारी झोन क्र. 10 अंतर्गत जरीपटका हॉकर्स झोन येथील सार्वजनिक/सुलभ शौचालयाचे बांधकाम ई– निविदा मागवुन निम्नतम निविदाकाराकडुन करण्यात आलेले आहे. या सार्वजनिक/सुलभ शौचालयाचे बांधकाम पूर्ण झालेले असल्यामुळे नागरिकांच्या उपयोगाकरिता ''पैसे द्या व वापरा'' या तत्वावर स्थायी समिती ठराव क्र. 80, दि. 01.06.2015 अन्वये सार्वजनिक/सुलभ शौचालये दिर्घकाळाकरिता संचालन, देखभाल व सुस्थिती राखणे हे काम करून घेण्याकरिता सेवाभावी अशासकीय संस्थेस मंजुर अटी व शर्तीनुसार नामीत केलेले आहे. त्यात अनु. क्र. 2 वर मेहतर मागासवर्गीय सर्वांगीण विकास संस्था यांचे नांव असल्याने जरिपटका हॉकर्स झोन येथील सार्वजनिक/सुलभ शौचालय ''पैसे द्या व वापरा'' या तत्वावर 30 वर्षाकरिता संचालन, देखभाल व सुस्थिती राखण्याचे कामाकरिता मेहतर समाज सर्वांगीण विकास संस्था यांना देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 591:– प्रभाग क्र. 24 अ, ब आणि क डिप्टी सिग्नल पुंजारामवाडी {लोककर्म झोन 08} येथे सिमेंट कॉक्रीट रोडचे बांधकाम करण्यास्तव मे. दिप कन्स्ट्रक्शन यांची प्राकलनीय दरापेक्षा 14.04 टक्के कमी दराची रु. 38,36,431/– रकमेची निम्नतम निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली. या कामाचा खर्च पद क्र. ए22001330803 अंतर्गत प्रस्तावित आहे.

ठराव क्रमांक 592:– {ई–गव्हर्नन्स} ***M/s. Ace Brain System and Software Pvt. Ltd., Pune यांचे उर्वरित देयक काढण्याबाबत.***

***ई-गव्हर्नन्स प्रणालीच्या आवश्यक Network Connectivity साठी Local Area Network स्थापित करणे, देखभाल व दुरुस्ती करणे तसेच Network साठी लागणारे साहित्यांचे पुरवठा व Installation करण्याच्या कामाचा तीन वर्षाचा कार्यादेश क्र. 242/CE/2013 दि. 20/12/2013 रोजी M/s. Ace Brain System and Software Pvt. Ltd., Pune ला देण्यात आला होता. कार्यादेशानुसार या कामाची मंजूर राशी रु. 24,92,472/- इतकी होती. या कामाचे म.न.पा. ने माहे मार्च-2016 पर्यंतच्या देयाकांचे रु. 22,16,916/- इतके भूगतान केलेले आहे. या कामासाठी नंतर नवीन निविदा मागविण्यात आल्या व त्याचा कार्यादेश दि. 01/09/2017 रोजी करण्यात आला. परंतु सदर कार्य बंद ठेवता येत नसल्यामुळे दि. 31/08/2017 पर्यंत जुन्या एजेन्सी M/s. Ace Brain System and Software Pvt. Ltd., Pune यांच्या कडून हे काम करून घेण्यात आले. त्यानुसार त्यांनी सादर केलेले देयक दि. 13/09/2017 नुसार त्यांचे रु. 8,28,616/- चे देयक सादर केले. ही रक्कम कार्यादेश रु. 24,92,472/- च्या पेक्षा रु. 5,53,060/- ने जास्त आहे.***

***सबब कार्यादेश रक्कमेपेक्षा रु. 5,53,060/- रक्कमेच्या अतिरिक्त खर्चास मंजुरी प्रदान करण्याचा*** **प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.**

ठराव क्रमांक 593:– {कार्य.अभि. बांधकाम} नागपुर शहरातील सिमेंट कॉक्रीट रस्ते टप्पा – III अंतर्गत, पॅकेज क्र.– 2 अंतर्गतील रस्ता क्र. 1 ईमांमवाडा रोड– डालडा फॅक्ट्री चौक ते ग्रेट नाग रोड ते आयशोलेशन हॉस्पिटल पर्यंत. रस्ता क्र. 2 रेल्वे फिडर– रोड कॉटन मार्केट चौक ते मौक्षधाम चौक. रस्ता क्र. 3 आजाद चौक ते लकडी पूल व झेंडा चौक ते सक्करदरा चौक जुनी शुक्रवारी मार्गाने. रस्ता क्र. 4 महेंदी बाग रोड –क्राडॅक रोड मसकासाथ चौक ते राऊत चौक ते खेरीपूरा रेल्वे क्रॉसिंग (कांजी हॉऊस चौक ते रिंग रोड, उत्तर विधानसभा क्षेत्रात ). रस्ता क्र. 5 मनीपूरा चौक ते लाकडीपुल, आयचीत मंदिर चौका पर्यंत. रस्ता सिमेंट कॉक्रीट चा तयार करण्याकरीता रू. 22,33,20,982/– राशीचे कामास्तव मागविण्यात आलेल्या ई – निविदेतील निम्मतम निविदाकार में. जे. पी. ईन्टरप्राईजेस यांची प्राकलनीय दरापेक्षा 0.001 टक्के कमी दराची रू. 22,33,18,972/– रकमेची निम्नतम निविदा मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 594:– {लोककर्म कार्य. बांध.} नागपुर शहरातील सिमेंट कॉक्रीट रस्ते टप्पा – III अंतर्गत, पॅकेज क्र.– 8 अंतर्गतील 1) रस्ता क्र. 31 एकस्तंभ चौका पासून ते नार्थ अंबाझरी रोड पर्यंत (अजित बेकरी रोड). 2) रस्ता क्र. 32 बोरगांव चौका पासून ते अवस्थी नगर चौक ते सादीकाबाद टी पाईंट पर्यंत. 3) रस्ता क्र. 33 मंगलवारी रेल्वे क्रॉसिंग गेट, हरिजन कॉलनी ते जुना जरीपटका (मेकोसाबाग) ते सी.एम.पी.डी.आय. ते नारा घाट रोड पर्यंत. रस्ता क्र. 34 गोकूलपेठ बाजार रोड, कॉफी हाऊस चौक (वेस्ट हायकोर्ट रोड) ते रामनगर टेकडी रोड व कॉफी हाऊस ते धरमपेठ झेंडा चौक ते गजानन मंदिर ते ट्रॉफिक पार्क पर्यंत. रस्ता सिमेंट कॉक्रीटचा तयार करण्याकरीता रू. 31,66,79,162/– राशीचे कामास्तव मागविण्यात आलेल्या ई–निविदेतील निम्मतम

निविदाकार में. जे. पी. इंटरप्राईजेस, यांची प्राकलनीय दरांपेक्षा 2.56 टक्के अधिक दराची रू. 32,63,69,544/– रकमेची निम्नतम सुधारीत निविदा मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 595:– प्रभाग क्र. १२ येथे मौजा हजारीपहाड येथिल १८.००
{लोककर्म डी.पी रोड} मिटर रूंदीचा डी. पी. रस्ता विकासीत करण्याच्या रू. ३,३४,०९,७५१/– (तीन कोटी चौतीस लक्ष नव हजार सातशे एक्कावन रूपये फक्त ) रक्कमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा तसेच नविन पद क्र. A४२००१३७०४०६(जुने पद क्र. ६५२) अंतर्गत तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न तसेच या कामास्तव म. न. पा. मध्ये नोंदणीकृत प्रकल्प व्यवस्थापकीय सल्लागार मे. Axykno Capital Services Limited यांची मनपाच्या मंजुर दरावर नेमणुक करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 596:– रेशिमबाग स्थित कविवर्य सुरेश भट सभागृहाचे दैनंदिन
{शहर अभियंता} रखरखाव, सुरक्षा व्यवस्था, विद्युत उपकरणाचे संचालन, ध्वनी व्यवस्थेचे संचालन इत्यादी तत्सम कामांकरिता स्थायी समिती ठराव क्र. २३२ दिनांक १६.११.२०१७ अन्वये तीन महिन्यांकरिता रू. १३,५०,०००/– प्रति माह प्रमाणे काम करण्याकरिता नियुक्त निविदाकार मे. स्पिक ॲन्ड स्पॅन सर्व्हीसेस यांची मुदत दिनांक २८.०२.२०१८ रोजी संपत असल्याने त्यांचे मंजुर निविदा अटी व शर्थी नुसार पुढील तीन महिन्यांकरिता मुदतवाढ देण्याचा व या कामाकरिता येणाऱ्या खर्चास स्थायी समितीची मंजुरी प्रदान करणे तसेच याकरिता रू. ४०,५०,०००/– रकमेचा कार्यादेश निर्गमित करण्यास मंजुरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन एक वर्षाकरिता मुदतवाढ देण्यास समितीने विषयास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 597:– प्रभाग क्र. 23 अ हिवरी ले आऊट येथे श्री चाफले ते श्री
{लोककर्म झोन 08} ओस्तवाल यांचे घरापर्यंत सिमेंट कॉक्रीट रस्त्याचे बांधकाम करण्याच्या कामास्तव प्राप्त निविदाकार मे. अमित कंन्स्ट्रक्शन यांची प्राकलनीय दरापेक्षा 14.3383 टक्के कमी दराची रु. 58,08,838/– राशीची निम्नतम निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 598 :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर